महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com   www.facebook.com/maharashtra.c.times   Info@maharashtracrimetimes.com   Twitter- @MHCrimeTimes   Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: २१ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार २४ ऑगस्ट २०२१ ते सोमवार ३० ऑगस्ट २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

## थोडक्यात

### पावसाची विश्रांती; आठवड्यात केवळ हलक्या सरी

**पुणे (शकिल शेख)-** कमी दाबाचा पट्टा विरल्याने राज्याच्या बहुतांश भागांत आता सुमारे आठवडाभर पावसाची विश्रांती राहण्याची शक्यता आहे. या कालावधीत कधी ऊन, तर कधी हलक्या श्रावणधारा बरसतील. पाऊस ओसरल्याने सध्या अनेक भागांत तापमानात वाढ नोंदविण्यात येत



आहे. ऑगस्टच्या पहिल्या टप्प्यामध्ये कोकण आणि मध्य महाराष्ट्रासह विदर्भात अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली आहे. मराठवाड्यात काही भागांत पाऊस झाला. अरबी समुद्रातील कमी दाबाचा पट्टा, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पहिल्या टप्प्यात राज्यात जोरदार पाऊस झाला. तीन दिवसांपूर्वी विदर्भापासून पूर्वमध्य अरबी समुद्रापर्यंत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला होता. तो उत्तर महाराष्ट्रातून गेल्याने पावसात मागे पडलेल्या नाशिक, धुळे जिल्ह्यांत काही प्रमाणात पाऊस होऊ शकला. हा पट्टाही आता विरला असल्याने राज्यात सर्वत्रच पाऊस ओसरला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील पाच दिवस तरी राज्याच्या कोणत्याही भागात मोठ्या पावसाची शक्यता नाही. अनेक ठिकाणी सध्या कोरड्या हवामानाची स्थिती निर्माण होत असल्याने पाऊस पूर्णपणे विश्रांती घेण्याची शक्यता आहे. ऑगस्टअखेपर्यंत पावसाचे प्रमाण कमीच राहणार आहे.

### '...त्यामुळे नारायण राणेंचं डोकंही सूक्ष्म झालेलं आहे'; गुलाबराव पाटलांची गंभीर टीका!

**मुंबई (विशाल कारंडे)-** 'नारायण राणे किती दिवस अस्वस्थ होते हे आपण पाहिलेलं आहे. त्यांचा अस्वस्थपणा आता मंत्रिपद मिळाल्याने बाहेर निघालेला आहे. पूर्वी ते शिवसेनेत अस्वस्थ होते, नंतर काँग्रेसमध्ये गेले तिथे अस्वस्थ झाले. आता त्यांना सूक्ष्म, लघु खातं मिळालेलं आहे,



त्यामुळे त्याचं डोकंही सूक्ष्म झालेलं आहे.' अशा शब्दांमध्ये शिवसेना नेते आणि जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी माध्यमांशी बोलाताना केंद्रीयमंत्री नारायण राणे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. राज्याचे नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेत कंटाळले असून मातोश्रीवर विचारुनच त्यांना सर्व निर्णय घ्यावे लागतात, असा आरोप केंद्रीयमंत्री नारायण राणे यांनी केलेला आहे. एवढंच नाही तर एकनाथ शिंदे हे केवळ सहीपुरते मंत्री उरले आहेत असंही जन आशीर्वाद यात्रेनिमित्ताने वसईत आलेल्या नारायण राणेंनी पत्रकार परिषदेत म्हटलं होतं.



# राज्य सरकारने दहीहंडीला परवानगी नाकारली

**मुंबई (योगेश होळंब)- मुंबईसहीत महाराष्ट्रामध्ये दहीहंडी आयोजित करण्याला राज्य सरकारने परवानगी नाकारली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्रातल्या गोविंदा पथकांच्या प्रतिनिधीसोबत घेतलेल्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला आहे. करोनामुळे मागील वर्षी मुंबई, ठाण्यासहीत राज्यभरातील दहीहंडी पथकांनी उत्सव साजरा केला नव्हता. यंदा छोट्या प्रमाणात का असेना उत्सवाला परवानगी द्यावी अशी मागणी केली होती. जागेवरच मानाची हंडी फोडण्यास परवानगी द्यावी अशी मागणी समन्वय समितीने प्रशासनाकडे केली. तसेच सर्व गोविंदांना लशीचे दोन डोस पूर्ण करणार आणि सुरक्षित दहीहंडी उत्सवाची जबाबदारी आमची असेल असं या बैठकीमध्ये समन्वय समितीने सरकारला सांगितलं.**

दहीहंडी साजरी केल्याने जास्त मोठ्या प्रमाणावर करोनाचा प्रभाव वाढू शकतो असं टास्क फोर्सने सांगितलं असल्याचं सरकारकडून स्पष्ट करण्यात आलं. हा उत्सव जागतिक स्तरावर टीकावा अशी बाजू समन्वय समितीने मांडली. गणेशोत्सवाप्रमाणे नियम आखण्याची मागणीही समितीने केली. मात्र बैठकीला उपस्थित असणारे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी परवानगी का देऊ शकत नाही हे समन्वय समितीच्या सदस्यांना समजावून सांगितलं. एकदा परवानगी दिली आणि प्रभाव वाढला तर उत्सवाला आणि संस्कृतीला गालबोट लागेल. यावेळी तुमची इच्छा असली तरी सरसकट परवानगी देता येणार नाही असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. आम्ही गोविंदा पथकांवर लक्ष कसं ठेवणार. यंत्रणांवरील ताण वैगेरे पाहता मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक आवाहन केलं आहे. परवानगी नसल्याने आम्ही दहीहंडीचं आयोजन न करण्याची भूमिका घेणार आहोत, असं समन्वय समितीने सांगितलं आहे.

**मनसेची घोषणा...**

एकीकडे ही बैठक होत असतानाच दुसरीकडे एका महिन्यापूर्वीच मनसेनं दहीहंडी जल्लोषात साजरी करण्याचा निर्धार केला आहे. यंदा ३१ ऑगस्ट रोजी विश्वविक्रमी दहीहंडी साजरी होणार असल्याचं मनसेकडून जाहीर करण्यात आलं आहे. मनसे नेते अभिजित पानसे यांनी फेसबुक पोस्ट करून हे जाहीर केलं आहे. बुधवारी दुपारी त्यांनी ही पोस्ट केली असून त्यामध्ये 'विश्वविक्रमी दहीहंडी ३१ ऑगस्टला होणार', असं म्हटलं आहे.

**'पारंपरिक दहीहंडीला परवानगी द्या ; उत्सवाची परंपरा कायम राहील अशी भूमिका घ्या' - आशिष शेलार**

'काही गणेशोत्सव मंडळांनी करोना काळात ज्या पद्धतीने करोनाचे नियम पाळून उत्सवाची परंपरा कायम ठेवली, त्याच पद्धतीने दहीहंडी उत्सवाची परंपरा अखंड रहावी. म्हणून पारंपरिक पद्धतीने दहीहंडी साजरी करण्यास राज्य सरकारने परवानगी द्यावी.' अशी मागणी भाजपा नेते आमदार आशिष शेलार यांनी केली आहे. तसेच, 'लसीचे दोन डोस ज्यांनी घेतले आहेत, अशा गोविंदांना कमी उंचीच्या दहीहंडीला शासनाने परवानगी द्यावी. करोनाची परिस्थितीची कल्पना सर्वांना असून त्याबद्दल खबरदारी व काळजी घेण्यास जी उत्सव मंडळे तयार आहेत. त्यांना गर्दी न करता आप-आपल्याला विभागात पारंपरिक पध्दतीने कमी उंचीच्या दहीहंडीला परवानगी शासनाने द्यावी.

## राजू शेट्टींच्या नेतृत्वात पूरग्रस्त शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर 'आक्रोश' मोर्चा!

**कोल्हापूर (राजेश गायकवाड)-** 'कृष्णा, पंचगंगा नदीतील महापुराचे पाणी बोगद्यातून दुष्काळी भागाकडे वळवण्याच्या घोषणा निव्वळ धूळफेक आहे. अशा मोठ्या भांडवली खर्चच्या योजना आखून त्यातून पैसे हाणायचा उद्योग होणार आहे. जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांची ही योजना कधीच पूर्ण होणार नाही.', अशी टीका माजी खासदार व स्वाभीमानी शेतकरीचे संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली पूरग्रस्त शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा आज कोल्हापुरातील दसरा चौकातून काढण्यात आला. हजारो शेतकरी न्याय मिळाला पाहिजे, अशा घोषणा देत जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहचले. यावेळी राजू शेट्टी यांनी शासनाच्या भूमिकेवर जोरदार टीका केली.



शेतकऱ्यांना मदत करणार अशी घोषणा करून, आघाडी सरकार पूरग्रस्तांची फसवणूक करीत आहे, असा आरोप करून शेट्टी म्हणाले की, 'पूरग्रस्तांना पॅकेज देण्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. पण अजूनही कसलीही मदत मिळाली नाही. मदत मिळण्यासाठी मी ठाकरे यांच्याकडे गेलो पण भेट दिली नाही. अजूनही मदत दिली जात नाही. सानुग्रह अनुदान ही उपलब्ध केलेले नाही. मागील २०१९ सालच्या महापुराप्रमाणे मदत केली पाहिजे. पुराने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. शाळा, कॉलेज सुरू झाले असल्याने फी कशी भरायची? याची चिंता सतावत असल्याने ती माफ झाली पाहिजे.' पूरग्रस्त शेतकऱ्यांनी आंदोलन करू नये. राज्यशासन मदतीसाठी तत्पर आहे, असे आवाहन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ व पालकमंत्री सतेज पाटील यांनी केले होते. दोन्ही मंत्र्यांवर राजू शेट्टी यांनी टीका केली. ते म्हणाले, 'महिना झाला तरी पूरग्रस्त शेतकऱ्यांना दमडीही मिळाले नाही. अशावेळी केवळ नुसते शांत बसायचे की भजन करत राहायचे हे मुश्रीफ यांनी सांगावे.

## 'गुळाला चिकटलेल्या मुंगळ्यांप्रमाणे सत्तेला चिकटलेले तीन पक्ष', फडणवीसांचा महाविकास आघाडीवर हल्लाबोल

**मुंबई (विशाल पाटील)-** विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. या दरम्यान देवेंद्र फडणवीस यांनी महाविकास आघाडी सरकारवर जोरदार टीका केली आहे. हया तीन पक्षांची युती ही अनैसर्गिक असल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली आहे. तसंच या तीन पक्षांची तुलना त्यांनी गुळाच्या ढेपेला चिकटलेल्या मुंगळ्यांशी केलेली आहे. मुंबईत आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये बोलत असताना देवेंद्र फडणवीस म्हणाले,



महाविकास आघाडीचे लोक हे अनैसर्गिक युतीने एकत्र आलेले आहेत. विचारसरणी, विचार, गव्हर्नन्स नाही. केवळ सत्तेला चिकटलेले अशा प्रकारचे हे लोक आहे. ज्याप्रमाणे गुळाच्या ढेपेला मुंगळे चिकटतात, त्याप्रमाणे सत्तेला चिकटलेले हे तीन पक्षष्ठत्यामुळे सत्तेचा वाटा मिळाला नाही की ते ओरड होते. वाटा मिळाला की सगळे बंडोबा थंडोबा होतात. मंत्रालयासमोर विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केलेले शेतकरी सुभाष जाधव यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. यावरही देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केलं आहे. याबद्दल ते म्हणाले, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. शेतकऱ्यांचं म्हणणं ऐकून घेण्याकरता कोणतीही व्यवस्था उरलेली नाही. ज्या प्रकारे अधिकाऱ्यांच्या पोस्टिंग होत आहेत की त्यांना गरिबाकडे पहायला फुरसत नाही.

## '३१ ऑगस्टनंतरही तुमचं सैन्य अफगाणिस्तानमध्ये थांबलं तर'; तालिबानने अमेरिकेला धमकावलं

तालिबानने अफगाणिस्तान ताब्यात घेतल्यानंतरही अमेरिकेन सैन्य अफगाणिस्तानमध्ये आहे. ३१ ऑगस्टनंतरही तुमचं सैन्य अफगाणिस्तानमध्ये राहिल्यास त्याचे परिणाम अमेरिकेवर होतील, अशा शब्दांत तालिबानने अमेरिकेला धमकावलं आहे. सैन्य हटवण्यासाठी ३१ ऑगस्टची शेवटची मुदत तालिबानने अमेरिकेला दिली आहे. दरम्यान, अफगाणिस्तानमध्ये अडकलेल्या अमेरिकन नागरिकांना बाहेर काढण्यासाठी अमेरिकन सैनिक काबूलमध्ये राहू शकतात, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी म्हटलं होतं.

दरम्यान, तालिबानने काबूलमधून



हजारो अफगाणी नागरिक आणि परदेशी लोकांच्या निर्वासनासाठी अमेरिकेला जबाबदार धरले होते. 'अमेरिका, त्यांच्या सर्व शक्ती आणि सुविधांसह काबूल विमानतळावर सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरली आहे. केवळ काबूल विमानतळ वगळावरील अराजकता वगळता संपूर्ण देशात शांतता आहे,' असं तालिबानचे अधिकारी अमीर खान मुताकी यांनी रविवारी म्हटलं होतं.

## देशमुखांच्या अडचणी वाढल्या, पालांडे-शिंदेविरोधात आरोपपत्र दाखल

**मुंबई (नितीन देवळेकर)-** राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. मनी लॉंड्रिंग



प्रकरणात देशमुख यांचे माजी पीए संजीव पालांडे आणि कुंदन शिंदे यांच्याविरोधात अंमलबजावणी संचलनालयाने आरोपपत्र दाखल केलं आहे. सोमवारी सकाळी ईडीच्या वतीने विशेष कोर्टात हे आरोपपत्र दाखल करण्यात आलं. महाराष्ट्र पोलिसांच्या १०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणी मनी लॉंड्रिंग कायद्यांतर्गत अनिल देशमुख यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणामुळे अनिल देशमुख यांना गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. या प्रकरणात आतापर्यंत देशमुख यांचे माजी सचिव संजीव पालांडे आणि कुंदन शिंदे या दोघांना अटक करण्यात आली आहे. २५ जून रोजी दोघांना अटक करण्यात आली होती. सोमवारी दोघांवर ईडीने आरोपपत्र दाखल केलं आहे. संजीव पालांडे आणि कुंदन शिंदे मागील दोन महिन्यांपासून तुरुंगात आहेत. सुरुवातीला दोघेही ईडीच्या कोठडीत होते. त्यानंतर त्यांना न्यायलयीन कोठडी सुनावण्यात आली होती. गेल्या दोन महिन्यांपासून ते जेलमध्ये आहेत. संजीव पालांडे आणि कुंदन शिंदे यांना अटक करुन दोन महिने उलटले आहेत. त्यानंतर आज सोमवारी आरोपपत्र दाखल केलं आहे.

## 'सप्टेंबरमध्ये दररोज आढळू शकतात कोरोनाचे ४-५ लाख नवे रूग्ण'! २ लाख बेड तयार ठेवण्यास सांगितलं

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** मागील एक वर्षात कोरोना व्हायरसच्या संसर्गाने देशाला उद्ध्वस्त केले आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेतून भारत अद्याप सावरलेला नाही. देश-विदेशात तिसऱ्या धोकादायक लाटेची शक्यता व्यक्त केली जात आहे. आता भारताच्या निती आयोगा ने सुद्धा कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता व्यक्त केली आहे. निती आयोगाचे सदस्य व्ही. के. पॉल यांनी मागील महिन्यात सरकारला कोरोना संसर्गाला तोंड देण्यासाठी काही सूचना दिल्या होत्या. यात म्हटले होते की भविष्यात प्रति १०० कोरोना व्हायरस संसर्गाच्या प्रकरणांपैकी २३ प्रकरणांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्याची व्यवस्था करावी लागेल.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत ऑक्सीजन आणि औषधांअभावी अनेक रूग्णांना जीव गमवावा लागला होता, तसेच प्रचंड गोंधळ उडाला होता. कारण, कोरोना संसर्गाचा वेग इतका जास्त होता की तेवढ्या वेगाने



वैद्यकीय सुविधांची व्यवस्था करता आली नाही. अशावेळी तिसऱ्या लाटेची शक्यता व्यक्त होत असताना वैद्यकीय सुविधांची व्यवस्था आतापासूनच केली गेली पाहिजे.

कोविड-१९ आपल्या सर्वोच्च पातळी होता तेव्हा १ जूनला देशभरात सक्रिय केस लोड १८ लाख होता. तेव्हा २१.७४ टक्के केसमध्ये बहुतांश प्रकरणांच्या १० राज्यांत हॉस्पिटलमध्ये दाखल होण्याची आवश्यकता भासली होती. यापैकी २.२ टक्के लोक आयसीयूमध्ये दाखल होते.

नीती आयोगाचे म्हणणे आहे की यापेक्षा सुद्धा वाईट स्थितीसाठी आपल्याला तयार राहिले पाहिजे. आयोगाने एका दिवसात ४ ते ५ लाख कोरोना केसचा अंदाज वर्तवला आहे. यासोबतच म्हटले आहे की, पुढील महिन्यात दोन लाख आयसीयू बेड तयार केले पाहिजेत. यामध्ये व्हेंटिलेटरसह १.२ लाख आयसीयू बेड, ७ लाख विना आयसीयू हॉस्पिटलचे बेड (यापैकी ५ लाख ऑक्सीजनाचे बेड) आणि १० लाख कोविड आयसोलेशन केयर बेड असावेत.

## कल्याण सिंह यांच्या पार्थिवावरील राष्ट्रध्वजावर भाजपचा झेंडा!

**लखनऊ (अलीहूसेन शेख)-** उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कल्याण सिंह यांच्या पार्थिवाच्या अत्यंदर्शनावेळी एक धक्कादायक बाब समोर आली. शासकीय इतमामात होत असलेल्या या कार्यक्रमात कल्याण सिंह यांच्या पार्थिवावर असलेल्या राष्ट्रध्वाजावर भाजपचा झेंडा ठेवण्यात आला होता. प्रोटोकॉलच्या विरोधातील हे कृत्य असल्याचं सांगत यावर कॉंग्रेसने आक्षेप घेतला असून हे योग्य आहे का? असा सवाल केला आहे. कॉंग्रेस नेते श्रीनिवास बीवी यांनी हा फोटो ट्विट करत म्हटलं की, 'नव्या भारतात भारताच्या राष्ट्रध्वाजावर पक्षाचा झेंडा लावणं योग्य आहे का?' त्यांच्या या ट्विटला अनेकांनी प्रतिसाद देत हे चुकीचं असल्याचं म्हटलं आहे. अश्विनी बगरी नामक एका युजरने म्हटलं की, अशी कृती करणाऱ्यांवर गुन्हा दाखल व्हायला हवा. राष्ट्रध्वजावर भाजपचा झेंडा कसा असू शकतो असा सवालही त्यांनी केलाय. संविधानात कायदे सर्वांसाठी एकच असतात. मग भाजपावाल्यांसाठी का नाहीत? असंही या युजरनं म्हटलंय. तर श्रद्धा कुमारी नामक एका युजरनं म्हटलं की, भाजप आपल्या झेंड्याचा प्रचाराची एकही संधी सोडत नाही.

दरम्यान, कल्याण सिंह यांचं शनिवारी दीर्घ आजारानं रुग्णालयात उपचारांदरम्यान निधन झालं. दरम्यान,



आज त्यांचं पार्थिव शरीर अंत्य दर्शनासाठी लखनऊ येथे भाजपच्या कार्यालयात ठेवण्यात आलं आहे. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह देशातील विविध नेत्यांनी कल्याण सिंह यांच्या पार्थिवाच शेवटचं दर्शन घेतलं. २३ ऑगस्ट रोजी गंगेच्या घाटावर अंत्यविधी पार पडणार आहे. कल्याण सिंह यांच्या पार्थिवावर राष्ट्रध्वाजाच्यावर भाजपचा झेंडा ठेवण्यात आल्यानं गदारोळ माजलेला असला तरी भाजपनं असं का केलं हे जाणून घेऊयात. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री होण्यापूर्वी कल्याण सिंह हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते होते. त्यानंतर त्यांना भाजपचे कट्टर सदस्य म्हणून ओळख मिळाली.

## करोनाची तिसरी लाट ऑक्टोबरमध्ये टिपेला पोहोचू शकते, मुलांना धोका; गृहमंत्रालयाच्या समितीचा PMOला अहवाल

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा)-** नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिजास्टर मॅनेजमेंट अंतर्गत नेमण्यात आलेल्या तज्ज्ञांच्या समितीने करोनाच्या तिसऱ्या लाटेबाबत सरकारला इशाला दिला आहे. करोनाची तिसरी लाट ऑक्टोबरमध्ये येऊ शकते. यात खासकरून प्रौढांपेक्षा लहान मुलांना अधिक धोका असून त्यांच्या उपचारासाठी वैद्यकीय तयारी करावी, अशी सूचना समितीने केली आहे. ही समिती केंद्रीय गृहमंत्रालयाच्या निर्देशावरून स्थापन करण्यात आली आहे. लहान मुलांवर उपचार सुविधा, डॉक्टर, स्टाफ, वैद्यकीय उपकरणं उदा. व्हेंटिलेटर्स, अॅम्ब्युलन्स इत्यादी बाबींची सुविधा उपलब्ध करावी. तसंच अंदापेक्षाही अधिक लहान मुलांना करोनाचा संसर्ग झाल्यास कुठल्याही गोष्टीचा सामना करण्यासाठी तयारी ठेवावी, असं समितीने पंतप्रधान कार्यालयाला दिलेल्या अहवालात म्हटलं आहे.

लहान मुलांना प्राधान्याने करोनावरील लस देणं गरजेचं आहे. खासकरून गंभीर



आजार असलेल्या आणि व्यंग असलेल्या मुलांना लस द्यावी. करोनाची तिसरी लाट ऑक्टोबर अखेर टिपेला पोहोचू शकते. यामुळे विविध संस्थांकडून लाटेबाबत अंदाज घेण्याची सूचना द्यावी, असं समितीने अहवालात म्हटलं आहे. अनेक अभ्यासातून करोनाच्या तिसऱ्या लाटेचा अंदाज वर्तण्यात आला आहे.

लहान मुलांना प्राधान्याने करोनावरील लस देणं गरजेचं आहे. खासकरून गंभीर आजार असलेल्या आणि व्यंग असलेल्या मुलांना लस द्यावी. करोनाची तिसरी लाट ऑक्टोबर अखेर टिपेला पोहोचू शकते. यामुळे विविध संस्थांकडून लाटेबाबत अंदाज घेण्याची सूचना द्यावी, असं समितीने अहवालात म्हटलं आहे. अनेक अभ्यासातून करोनाच्या तिसऱ्या लाटेचा अंदाज वर्तण्यात आला आहे.



संपादक:- राकेश शंकर गोरे

# सावधान! रस्ता नवीन आहे...

सरकारने वाहतूक नियमनासाठी पावले उचलली हे योग्यच असले तरी केवळ कायदेकानू आणि नियमावलीने प्रश्न सुटेल, असे नाही. त्यासाठी जागृती, प्रशिक्षण आणि स्वयंशिस्तीचा संस्कार यांची आवश्यकता आहे. वाहतुकीला शिस्त लावायची तर आधी ती समाजात आली पाहिजे.

आपली संपूर्ण वाहतूक व्यवस्था वेगवेगळ्या कारणांनी संक्रमणातून जात असताना वाहनांच्या क्षेत्रातील उत्पादनवाढीला पूरक पायाभूत सुविधांची जोड देणे महत्त्वाचे ठरणार आहे. तसे न झाल्यास अनर्थ ओढवेल. या सुविधांमध्ये रस्त्यांची स्थिती, पार्किंगसाठी पुरेशा आणि योग्य ठिकाणी असलेल्या जागा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संपूर्ण वाहतुकीचे पद्धतशीर नियमन या प्रमुख बाबी असतील. वाहनांचा कर्णकर्कश आवाज आणि तुंबलेले रस्ते, नियमाची ऐशीतैशी करत लाल, पिवळ्या दिव्यांनाही न जुमानता दामटल्या जाणाऱ्या गाड्या, विरुद्ध दिशेने अचानक मुसंडी मारणारे बहाद्दर, अशी आपल्याकडच्या शहरी वाहतुकीची स्थिती आहे. कार्यालयीन कामकाजाच्या सकाळी नऊ ते अकरा आणि सायंकाळी साडेपाच ते रात्री आठ-साडेआठ या वेळात तर अनेक शहरांत रुग्णवाहिकेलाही वाट मिळणे मुश्कील असते. मुंगीसारखी वाहने धावत असतात. राजधानी दिल्ली असो नाहीतर गल्ली सगळीकडेच हेच चित्र, हीच व्यथा आणि रडकथा आहे. महामार्गावर तर कोण आधी पळतो, ही शंभरीपारची स्पर्धा किती जणांना जायबंदी करते, कितीजणांना आप्तांपासून हिरावून नेते, हे आणखी वेगळेच. वर्षाला आपण देशवासीय दीड लाखांवर जीवांना हकनाक गमावतो, अनेकांना कायमचे अपंगत्व येते, पण वाहने दामटणे काही थांबत नाही. त्यामुळेच केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना १५ दिवसांत इ-चलन पाठवावे आणि त्यानंतर दंडाची वसुली करावी, त्यासाठी हवी ती तांत्रिक साधने तातडीने बसवा, ही भूमिका स्वागतार्ह आहे.

१३२ शहरांत या नव्या निर्णयाची कार्यवाही होणार असून, यात महाराष्ट्रातील सर्वाधिक १९, खालोखाल उत्तर प्रदेश १७ आणि आंध्र प्रदेशातील १३ शहरे आहेत. दहा लाखांवर लोकसंख्या असलेली शहरे हा निकष याकरता आहे. याच्या जोडीला गर्दी असणारे राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग अशी ठिकाणे निवडलेली आहेत. यासाठी राज्यांकडून स्पीड



कॅमेरा, क्लोज्ड सर्किट टीव्ही, डॅशबोर्ड कॅमेरा, नंबरप्लेटची नोंद घेणारी स्वयंचलित यंत्रणा तसेच कार्यवाही करण्यासाठी स्पीड गन, बॉडी व्हेरिएबल कॅमेरा अशी सगळी तांत्रिक सज्जता अपेक्षित आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना वेळीच आवरून त्यांच्यावर दंडात्मक कारवाईची प्रक्रिया यामुळे गतिमान होईल. नियमांचे उल्लंघन केले की, १५ दिवसांत इ-चलन मिळेल, त्यानंतर दंडवसुली किंवा गरजेनुसार कार्यवाही होईल. तोपर्यंत पोलिसांच्या दप्तरी या सगळ्यांची नोंद साठवून ठेवली जाणार आहे. एकट्या महाराष्ट्रात गेल्या सुमारे पाच वर्षातील सुमारे साडेआठशे कोटींवर रकमेची इ-चलनाची वसुली रखडली आहे. यामध्ये एकट्या मुंबई शहरातील दंडाची रक्कम सुमारे तीनशे कोटींवर आहे. यावरून केंद्राने एकूण वाहतुकीच्या शिस्तीसाठी उगारलेला बडगा, त्याकरता तांत्रिक सज्जतेवर दिलेला भर आणि राज्यांवर टाकलेली जबाबदारी लक्षात येते.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे म्हणजे आपण मर्दमुकी गाजवली आहे, अशा अविर्भावात राहणाऱ्यांना यामुळे चाप लागेल, अशी अपेक्षा आहे. विशेषतः धूम बाईकवाल्यांची गुरगुर आपसूक कमी होईल. नियमांना हरताळ फासणाऱ्यांना हवालदाराच्या हातावर चिरीमिरी दिली की सुटता येते, हा भ्रमाचा भोपळाही फुटेल. 'चलता है' वृत्तीच्या मानसिकतेतून सगळ्यांनीच बाहेर येण्याची गरज आहे. वाहतूक नियमनासाठी तंत्रज्ञानाचा वापर करताना त्याची माहिती वाहनचालकांपर्यंत सातत्याने पोचली पाहिजे. सीसीटीव्हीची नजर आपल्या हालचालींवर आहे, हे माहीत असल्यानंतर वाहनचालक अधिक सावध होतील. नंतर दंड करण्यापेक्षा प्रतिबंध जास्त परिणामकारक ठरेल. खरे म्हणजे रस्ते हेच समाजाच्या प्रगती नि संस्कृतीचेही आरसे असतात. मानवी जीविताला सर्वोच्च महत्त्व देणे आणि जीवितहानी टाळण्याच्या सर्व व्यवस्था कार्यरत असणे हीच प्रगत असल्याची खूण असते. केवळ तंत्रज्ञान नि उपकरणे नव्हेत.

विशेषतः शहराशहरांत होणारी वाहतुकीची कोंडी, हवेचे प्रदूषण, नियमांच्या पायमल्लीने होणारे जीवघेणे अपघात, परवाने न घेता वाहन चालवणे, तसेच ड्रंक अँड ड्राईव्हसारखे प्रकार यामुळे घराबाहेर पडलेले माणूस सुखरूप घरी येईपर्यंत घरातल्या लोकांवर ताण असतो. महामार्ग चौपदरी, सहापदरी केले तरी ते अपुरे वाटावेत, इतकी वाहने सुसाटतात. रस्ते गुळगुळीत, विनाअडथळा असले तरी त्यावरून आपल्यासारखी इतरही वाहने धावतात, याचे भान नसल्याने वेगाची स्पर्धाच होते आणि होणारे अपघात निरपराध्यालाही शिक्षा करतात. वाहन चालवणाऱ्यांची मानसिकता बदलणे हे मोठे आव्हान आहे. हेल्मेट सक्तीची टूम वरचेवर निघते, पण स्वतःच्या सुरक्षिततेसाठी हेल्मेट महत्त्वाचे आहे, अशा मानसिकतेतून कितीजण सकारात्मक प्रतिसाद देतात, हा प्रश्नच आहे. म्हणून जादूची कांडी फिरल्यासारखे सगळे सुरळीत आणि तातडीने होईल, असे अजिबात म्हणता येत नाही. कारण राज्य सरकारांनी ही देखरेख यंत्रणा उभारायची आहे, तिची कार्यवाही होण्यासाठी पोलिसांना यंत्रसामग्री देणे जितक्या लवकर होईल तितकी कार्यवाही झटपट होईल.

वाहतूक नियमनाबाबत सातत्याने कडक पावले उचलली जातात, दंडाची रक्कम मोठी ठेवली जाते, याबाबत ओरड करण्यात काहीच अर्थ नाही. त्यांचे पालन करून सुरक्षित जीवन जगणे महत्त्वाचे आहे. गतिमानतेसाठी, आरामदायी प्रवासासाठी एकापेक्षा एक सरस वाहने, त्यांच्यात अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा निर्माण केल्या तरी त्यांच्या चलनवलनासाठी पूरक परिसंस्थाही निर्माण करायची असते. ती निर्माण करणे आणि दुसऱ्या बाजूला कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था तयार करणे, या बाबींना प्राधान्य द्यायला हवे.

## नियमित स्वच्छतेसाठी शहरातील रस्ते दत्तक देणार!

**नवी मुंबई (धनश्री सट्टा):** नवी मुंबई महापालिका प्रशासनाने पुढील स्वच्छ सर्वेक्षणाचे नियोजन जाहीर केले असून यात शून्य कचरा व रस्ते दत्तक योजनेची घोषणा केली आहे. त्यानुसार पालिकेच्या घनकचरा विभागाने तयारी केली आहे. रस्ते स्वच्छतेसाठी महापालिका प्रशासन काळजी घेत असले तरी यात आता लोकसहभाग वाढवून नियमित स्वच्छता ठेवली जाणार आहे.

नवी मुंबई शहरात मुख्य व अंतर्गत मिळून ५०५ किलोमीटरचे रस्ते आहेत. त्यात ६८ किलोमीटरचे मुख्य रस्ते असून यातील जास्तीत जास्त रस्ते या योजनेअंतर्गत दत्तक देण्याचा महापालिकेचा प्रयत्न राहणार आहे.

स्वच्छतेत नवी मुंबई शहर आग्रेसर आहे. गेल्या वर्षी देशात तिसरे व राज्यात पहिले आले आहे. तर या वर्षीचा निकाल अद्याप लागला नसून पालिका प्रशासनाने पहिला क्रमांक मिळेल यासाठी काम केले आहे. याबरोबर महाराष्ट्र राज्यात राबवलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात नवी मुंबई सलग तीन वेळा पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. यामुळे शहरात इतर शहरांच्या तुलनेत चांगली स्वच्छता असते. मात्र कचरा ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याने नियमित स्वच्छता महत्त्वाची आहे. यामुळे महापालिका प्रशासनाने पुढील सर्वेक्षणात शून्य कचरा व रस्ते दत्तक योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. रस्ते दत्तक योजनेत ते व्यापारी, नागरिक किंवा सामाजिक संस्थांना दत्तक दिले जाणार आहेत. यात ज्या विभागात ते राहतात किंवा कार्यरत आहेत तेथील रस्ते त्यांनाच दत्तक देण्यात येणार आहेत. रस्ते दत्तक घेतल्यानंतर संबंधितांनी दैनंदिन पाहणी करीत त्या रस्त्यावर असलेली



अस्वच्छता किंवा दुरवस्था छायाचित्रांद्वारे महापालिकेला कळवावी लागणार आहे. तेथील परिस्थितीचे छायाचित्र काढून ते महापालिका विकसित करीत असलेल्या प्रणालीवर पाठवायचे आहेत. याची दखल घेत महापालिकेचे स्वच्छता पथक त्या ठिकाणची स्वच्छता करणार आहे. त्यामुळे दैनंदिन रस्ते स्वच्छ राहणार असल्याचे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त बाबासाहेब राजळे यांनी सांगितले. नवी मुंबई शहर हे स्वच्छतेत तिसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. स्वच्छतेत पहिला क्रमांक मिळवण्यासाठी निश्चय केला आहे. शहरातील रस्तेही अधिक स्वच्छ राहण्यासाठी व त्यावर नागरिकांचे लक्ष व सहभाग वाढविण्यासाठी रस्ते दत्तक योजना राबवण्यात येणार आहे. नवी मुंबईकर या योजनेला चांगला प्रतिसाद देतील.

## बेकायदा एलईडी फलकांना अभय?

**ठाणे (तृप्ती गोरे):** पदपथांवर जाहिरात फलक तसेच इतर बांधकामे करण्यास उच्च न्यायालयाचा मनाई आदेश असतानाही भाजपच्या नगरसेवकांनी शहरातील पदपथांवर बेकायदा एलईडी फलक (स्क्रीन) उभारल्याचा आरोप करत त्यावर कारवाई करण्याची मागणी काँग्रेसच्या नगरसेवकांनी सर्वसाधारण सभेत केली. या आरोपानंतर एलईडी स्क्रीनबरोबरच शहरातील पदपथांवर उभारण्यात आलेली वाचनालये आणि बेंचवर कारवाई करण्याचा आग्रह धरत भाजपने सर्वपक्षीय नगरसेवकांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. अखेर सत्ताधारी शिवसेनेने नमती भूमिका घेत एलईडी स्क्रीनबाबत आयुक्तांशी चर्चा करून धोरणात्मक निर्णय घेणार असल्याचे जाहीर केले.

ठाणे शहराच्या मध्यवर्ती भागातील पदपथांवर तसेच चौकात भाजपच्या नगरसेवकांनी एलईडी स्क्रीन उभारल्या आहेत. या स्क्रीनच्या माध्यमातून नगरसेवक स्वत:ची जाहिरातबाजी करीत आहेत. या स्क्रीनचा वीजपुरवठा महापालिकेने खंडित केला आहे. हा वीजपुरवठा खंडित करण्यामागचे कारण स्पष्ट करण्याची तसेच स्क्रीनचा वीजपुरवठा पूर्ववत करण्याची मागणी भाजपचे नगरसेवक संजय वाघुले यांनी बुधवारच्या सर्वसाधारण सभेत केली. त्यास




काँग्रेसचे नगरसेवक विक्रांत चव्हाण यांनी आक्षेप घेत शहरात उभारलेले एलईडी स्क्रीन बेकायदा असल्याचा आरोप केला. शहरातील पदपथांवर जाहिरात फलक तसेच इतर बांधकामे करण्यास उच्च न्यायालयाने मनाई केली आहे. असा आदेश असतानाही पदपथांवर एलईडी स्क्रीन उभारण्यात आले असून या बेकायदा स्क्रीनवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. एलईडी स्क्रीनवर पालिकेचा निधी खर्च करण्याऐवजी प्रभागातील शौचालये, गटार-पायवाटा तसेच इतर महत्त्वाच्या कामांसाठी निधी खर्च करण्याचा सल्ला त्यांनी दिला. यावरून भाजपचे नगरसेवक आणि काँग्रेसचे नगरसेवक यांच्यात खडाजंगी झाली. शहरातील काही नगरसेवकांकडून कुटुंबीयांचे फोटो लावून जाहिरातबाजी केली जाते. पदपथावर वाचनालय उभारले जाते आणि बेंच बसविले जातात. वर्षानुवर्षे हा प्रकार सुरू असून ते इतके दिवस चालत होते. पण भाजपच्या नगरसेवकांनी स्क्रीन उभारली तर त्याला विरोध होत आहे, असे भाजप नगरसेविका मृणाल पेंडसे यांनी सांगितले.

## भातसा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**शहापूर (आकाश कांबळे)-** मुंबई महानगराला पाणी पुरवठा करणाऱ्या शहापूर तालुक्यातील तानसा, मोडकसागर धरणांपाठोपाठ आता भातसा धरणाचे दोन दरवाजे उघडण्यात आले आहे. भातसा धरण परिसरातील पावसाचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन धरणाचे दोन दरवाजे ०.२५ मीटरने उघडण्यात आले आहेत. यामधून १२४६ .२६ क्युसेक इतका पाण्याचा विसर्ग होत असल्याने भातसा नदीकाठी वसलेल्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरवषीजलपूजनाचा कार्यक्रम केल्यानंतर भातसा धरणाचे दरवाजे उघडण्यात येतात. त्यानुसार आमदार दौलत दरोडा, माजी आमदार पांडुरंग बरोरा, भातसा धरण विभागाचे कार्यकारी



अभियंता योगेश पाटील, सहाय्यक अभियंता श्याम हंबीर आदींच्या उपस्थितीत जलपूजनाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर धरणाचे दोन दरवाजे उघडण्यात आले. भातसा धरण परिसरात आत्तापर्यंत एक हजार ९२३ मिमी इतका पाऊस झाला आहे. धरणातील पाणीसाठा ८६३. ९८१ द.ल. घ.मी. इतका असून धरणाच्या पाण्याची पातळी १३७.८५ मीटर एवढी आहे. पातळी नियमित करण्यासाठी पाच दरवाजांपैकी एक व पाच क्रमांकाचे दरवाजे ०.२५ मीटरने उघडण्यात आले. नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ होत असल्याने सापगाव पूल तसेच सापगाव, खुटघर, बामणे, साजीवली, खुटाडी, भातसई या नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



## 'नंबर पहिला'च्या आशा उंचावल्या

**नवी मुंबई (धनश्री सट्टा):** गेली वर्षभर स्वच्छता अभियानात 'निश्चय केला नंबर पहिला' असे ध्येय ठेवून काम करणाऱ्या नवी मुंबई महापालिकेला हागणदारीमुक्त विभागातील सर्वोच्च 'वॉटर प्लस' मानांकन मिळाले आहे. यात राज्यातील एकमेव नवी मुंबई शहर तर देशातील चार शहरांचा समावेश आहे. त्यामुळे शहर सर्वेक्षणाच्या मुख्य स्पर्धेत कायम राहिल्याने 'नंबर पहिला'च्या आशा उंचावल्या आहेत. देशभरात स्वच्छता अभियान राबविण्यात येत असून, गतवर्षी नवी मुंबई महापालिका देशात तिसरी तर राज्यात पहिली आली होती. त्यामुळे यंदाच्या सर्वेक्षणात 'देशात प्रथम' येण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवत गेले वर्षभर करोनाशी लढत असतानाही काम केले आहे. यातील हागणदारीमुक्त विभागातील पहिला निकाल आला असून हागणदारीमुक्त शहरांच्या (ओडीएफ) श्रेणीमधील सर्वोच्च असणारे 'वॉटर प्लस' हे मानांकन मिळवले आहे. शहर हागणदारीमुक्त पूर्वीच झाले आहे. मात्र ते कायम राहावे यासाठी महानगरपालिका दक्ष आहे. 'गुड मॉर्निंग पथकांद्वारे याकडे लक्ष दिले जात आहे. शहरात ३९४ सार्वजनिक सामुदायिक, २२० सार्वजनिक, तर २० 'ई टॉयलेट' आहेत. तसेच महिलांकरिता सहा विशेष शौचालयेही आहेत. याशिवाय झोपडपट्टी भागात ५ हजार ०९४ घरगुती शौचालये अनुदानातून बांधली आहेत. शहराला पुरेशी शौचालयांची निर्मिती करून प्रशासन थांबले नाही तर महिला शौचालयांमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशिनची सुविधा करण्यात आली आहे. दैनंदिन स्वच्छता ठेवली जात आहेच शिवाय यावर नागरिकांचेही लक्ष राहावे यासाठी शौचालयांत 'क्युआर कोड बेस्ड' प्रणाली बसविण्यात आली आहे. शौचालयांचा वापर केल्यानंतर नागरिकांना आपला तत्काळ अभिप्राय नोंदवता येत आहे. अपंगांसाठी विशेष शौचालयांबरोबर मुलांकरिता 'बेबी टॉयलेट'चीही व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे नालेसफाईसाठी नावीन्यपूर्ण योजना, सांडपाण्याच्या टाकीची अत्याधुनिक वाहनांद्वारे सफाई आणि मलप्रक्रिया केंद्रात पुढील प्रक्रियेसाठी नियमित प्रणाली कार्यान्वित केली आहे. या सर्व कामाचे बक्षीस म्हणून महापालिकेला हागणदारीमुक्त सर्वेक्षणात 'वॉटर प्लस' हे मानांकन मिळाले आहे.

## ठाणे महापालिकेकडून खड्डे बुजवण्याचे काम सुरू

**ठाणे (सतिश सोनावणे)-** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शहरातील अंतर्गत मार्गावर खड्डे पडले आहेत. हे खड्डे बुजविण्याचे काम ठाणे महापालिकेने हाती घेतले असले तरी गेल्या काही दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरूच असल्याने महापालिकेचा हा खड्डेभरणा कार्यक्रम दिखाऊपणा ठरण्याची शक्यता अधिक आहे. सिमेंट, रेतीचे मिश्रण हे खड्डे बुजविण्यासाठी वापरात आणले जात असले तरी अजूनही शहरातील सेवा रस्ते, मुख्य अंतर्गत रस्त्यांवरील खड्डे कायम असल्यामुळे ठाणेकरांमधून नाराजीचा सूर उमटू लागला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. शहरातील मुख्य मार्गासह अंतर्गत मार्गावरही खड्डे पडल्याने वाहने चालविताना



जीव मुठीत घेऊन चालकांना ये-जा करावी लागते. माजिवडा, कापूरबावडी, नौपाडा, गोखले रोड आणि वागळे इस्टेट भागात रस्त्यांची अक्षरश: चाळण झाली आहे. त्यामुळे दररोज ठाणेकरांना खड्डे आणि वाहतूक कोंडीतून प्रवास करावा लागत आहे.

लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर मोठा गाजावाजा करत सुरू करण्यात आलेल्या मीनाताई ठाकरे उड्डाणपूल, तीन पेट्रोल पंप आणि नौपाडा येथील संत नामदेव चौकातील उड्डाणपुलांवरही खड्डे पडले आहेत. या उड्डाणपुलांच्या उभारणीमुळे शहरातील अंतर्गत रस्त्यांवरली कोंडी दूर होईल, असे दावे केले जात होते. प्रत्यक्षात काही ठिकाणी अत्यंत निमुळत्या असलेल्या या उड्डाणपुलांमुळे वाहनकोंडी दूर होण्याऐवजी अनेक ठिकाणी 'बॉटल नेक' तयार झाले आहेत. दरम्यान, ठाणे महापालिकेने या तिन्ही उड्डाणपुलांवर तात्पुरती खड्डेदुरुस्ती करण्यास सुरुवात केली आहे.

## डोंबिवलीत पोलिसाकडून मुलीचा विनयभंग

**डोंबिवली (शकिल शेख)-** पूर्वेतील रामनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस शिपायाने त्याच्या इमारतीमधील एका अल्पवयीन मुलीचा जिन्यातून जात असताना गुरुवारी विनयभंग केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी शक्रवारी रात्री उशिरा विनयभंग आणि पॉक्सो कायद्यांतर्गत रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. ही माहिती मिळताच पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी संबंधित शिपायाला सेवेतून तात्काळ निलंबित केले. सतीश कर्ले असे आरोपी पोलीस शिपायाचे नाव आहे. त्याला रामनगर पोलिसांनी शुक्रवारी अटक करून कल्याण न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. शनिवारी त्याला पुन्हा न्यायालयात हजर केले



असता, न्यायालयाने त्याची रवानगी आधारवाडी कारागृहात केली. आरोपी राहत असलेल्या इमारतीच्या जिन्यामधून पीडित मुलगी जात होती. त्यावेळेस त्याने तिचा विनयभंग केल्याची तक्रार आहे. मुलीने हा प्रकार कुटुंबीयांना सांगितला.

## पाणीवगळता सर्व विभागांचे सिडकोकडून लवकरच हस्तांतर

**पनवेल (दिगंबर जाधव)-** सिडकोकडून अद्याप अनेक सेवांचे पनवेल महापालिकेकडे हस्तांतरण न झाल्याने पालिका प्रशासनाला अनेक अडचणी येत आहेत. या महत्त्वाच्या विषयावर शुक्रवारी झालेल्या पालिकेच्या सर्वसाधारण सभेत गांभीर्यपूर्वक चर्चा झाली. नगरसेवकांनी असलेल्या त्रुटी पूर्ण करूनच हस्तांतरण करावे अशी आग्रही भूमिका मांडली. त्यानंतर पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी पाणी विभागवगळता सर्व सेवा सिडकोकडून लवकरच हस्तांतर करून घेणार असल्याची माहिती सभागृहात दिली. कामोठे येथील नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी सभागृहात प्रश्नोत्तराच्या काळात सिडको वसाहतींमधील समस्यांचा पाढा वाचला. याची री ओढत खांदेश्वर वसाहतीमधील नगरसेवक एकनाथ गायकवाड, कळंबोलीतील नगरसेवक सतीश पाटील यांनी संबंधित वसाहतीचे प्रश्न मांडले. मलनिस्सारण




वाहिनी, जलवाहिनी, सखल भागामुळे वसाहतींत निर्माण झालेले प्रश्न नगरसेवकांनी मांडले. हे सर्व प्रश्न सिडकोने सोडविल्याशिवाय सेवांचे हस्तांतर करणे पालिकेसाठी भुर्दंड ठरेल असे मत नगरसेवकांनी यावेळी मांडले. यावर महापालिका आयुक्त देशमुख यांनी पाणी विभागवगळता लवकरच वसाहतींचे हस्तांतर होणार असल्याचे सांगितले. ऑनलाइन सर्वसाधारण सभेत महापौरांच्या सूचना, त्यांचा आवाज नगरसेवकांना ऐकू येत नसल्याच्या अनेक तक्रारींमध्ये शुक्रवारी पालिकेची ऑनलाइन सभा झाली. त्यामुळे नगरसेवकांनी ५० टक्के उपस्थितीत ऑफलाइन सभा घेण्याची मागणी केली. शासनाच्या सूचनेनुसार निर्णय घेतला जाईल, असे प्रशासनो सांगितले. उपमहापौरांनी गेल्या महिन्यातील सभेत विचारलेल्या प्रश्नांना महिना उटल्यानंतर उत्तर पालिका प्रशासनाने न दिल्याने शेकापच्या पालिका सदस्यांनी सभेत याकडे लक्ष वेधले.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**
R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# स्वायत्त महिला प्रतिष्ठाने गथसमेने वृध्दाश्रमातील वृद्धांनां राखी बांधून केली राखी पौर्णिमा साजरी

**पुणे (अभिजित येरल्लू):** आपल्या भारतीय संस्कृतीत सणांना फार महत्व आहे. त्यापैकीच रक्षाबंधन हा एक सण आहे. श्रावण पोर्णिमेस 'रक्षाबंधन' सण साजरा केला जातो. रक्षाबंधन या सणाला 'राखी पौर्णिमा' सुद्धा म्हटले जाते. हा सण बहीण-भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा दिवस आहे. श्रावण पोर्णिमेस राखी बांधावी, असे धर्मशास्त्रात म्हटले आहे. राखी बांधण्याचा अर्थ ती बांधणाऱ्या व्यक्तीच्या प्रेमरूपी बंधनात स्वतःला गुंतवून त्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे. रक्षाबंधन म्हणजे हातातील राखीस साक्षी मानून आपल्या बहिणीचे सदैव रक्षण



करण्याचे वचन देणे. हा सण संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरा केला जातो. चिंचवड येथील स्वायत्त महीला प्रतिष्ठान या संस्थेने देहूरोडच्या काळोखे वस्ती येथील गथसमेने वृध्दाश्रमास भेट देऊन आश्रमातील वृद्धांनां राखी बांधून आनंदी जीवन आणि दीर्घायुष्याची प्रार्थना करत रक्षाबंधनाचा सण साजरा केला. सर्व वृद्धांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसली. या प्रसंगी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा निर्मला जगताप, क्षमा धाडगे, जयश्री वीरकर, कांचन राजकर, संगीता कांबळे, नीरजा देशपांडे आदी सदस्य तसेच आश्रमाचे संतोष जॉय, मीना झाल्टे, व्हिक्टर सॅवियो, धीरज चंडालिया आदी सहकारी उपस्थित होते.

# राज्यात आठवी ते बारावीच्या ३८.१८ टक्के शाळा सुरू

**पुणे (अकिल शेख)-** राज्यात पाचवी ते सातवीच्या शाळा सुरू करण्याचा शिक्षण विभागाचा निर्णय कृती दलाच्या विरोधामुळे स्थगित करावा लागला. मात्र आठवी ते बारावीच्या ३८.१८ टक्के शाळा सुरू असून, विद्यार्थ्यांची उपस्थिती १४.६७ टक्के आहे. नागपूर विभागात सर्वाधिक ६६.५३ टक्के शाळा सुरू असल्याचे शिक्षण विभागाने संकलित केलेल्या आकडेवारीतून दिसून आले आहे. करोना संसर्ग कमी झाल्यावर शिक्षण विभागाने करोनामुक्त क्षेत्रातील आठवी ते बारावीचे वर्ग सुरू करण्यास जुलैमध्ये मान्यता दिली. त्यानंतर प्रत्यक्ष वर्ग सुरू झाले. पाचवी ते सातवीचे वर्गही सुरू करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला होता. मात्र तिसऱ्या लाटेची शक्यता विचारात घेऊन राज्य शासनाने नियुक्त केलेल्या तज्ज्ञांच्या कृती दलाने विरोध केल्याने पाचवी ते सातवीचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय स्थगित करावा लागला. तर आठवी ते बारावीचे वर्ग गेला महिनाभर ऑफलाइन पद्धतीने सुरू आहेत. शिक्षण विभागाने संकलित केलेल्या माहितीनुसार राज्यातील अमरावती, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, पुणे, मुंबई आणि लातूर या विभागांमध्ये मिळून १७ हजार ७०१ (३८.१८ टक्के ) शाळा सुरू आहेत. तर १५ लाख १२ हजार विद्यार्थी (१४.६७ टक्के



) उपस्थित होते. प्रामुख्याने ग्रामीण भागांतील शाळा सुरू आहेत. तर लातूर, मुंबई, मुंबई महापालिका, रायगड, धुळे, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील माहिती उपलब्ध नाही. नागपूर विभागात सर्वाधिक ६६.५३ टक्के शाळा सुरू आहेत. त्या खालोखाल अमरावती विभागातील ६५.१३ टक्के, लातूर विभागातील ६२.६७ टक्के, नाशिक विभागातील ४७.२२ टक्के पुणे विभागातील १९.४५ टक्के, कोल्हापूर विभागातील १८.९८ टक्के, मुंबई विभागातील ६.७६ टक्के शाळा सुरू आहेत. राज्यातील जिल्ह्यांमध्ये नांदेड जिल्ह्यातील सर्वाधिक ८९.२२ टक्के शाळा सुरू असल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. तर नंदूरबार जिल्ह्यातील ८७.६९ टक्के, भंडारा जिल्ह्यातील ८२.५८ टक्के शाळा सुरू आहेत.

# मिलिंद नार्वेकर यांच्याप्रमाणेच परब यांचेही रिसॉर्ट पाडण्याची मागणी

**मुंबई (विशाल कारंडे)-** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे स्वीय साहाय्यक व शिवसेना सचिव मिलिंद नार्वेकर यांच्या मुरुड (दापोली) समुद्रकिनाऱ्यावरील बेकायदा आलिशान बंगल्याचे बांधकाम रविवारी पाडण्यात आले. त्याचप्रमाणे या बंगल्याजवळील परिवहनमंत्री अनिल परब यांचेही बेकायदा रिसॉर्टचे बांधकाम पाडण्याची मागणी भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी केली आहे. मुरुड समुद्रकिनाऱ्यावर गेल्या दीड वर्षांत महाराष्ट्र तटीय नियमन क्षेत्रात (सीआरझेड)



२८ बंगले व रिसॉर्ट बांधले गेले आहेत. याविरोधात भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आवाज उठविला होता. सर्व नियम धाब्यावर बसवून हे बंगले व रिसॉर्ट बांधले गेले असल्याची तक्रार सोमय्या यांनी केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव, केंद्रीय आणि राज्य सरकारच्या पर्यावरण सचिवांकडे केली होती. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाचे डॉ. सुरेश कुमार अडापा व अन्य अधिकाऱ्यांचे पथक मुरुडला नुकतेच गेले होते. या अधिकाऱ्यांनी ही बांधकामे बेकायदा व नियमभंग करून करण्यात आल्याचा अहवाल दिल्याने राज्य सरकारला केंद्राने कारवाई करण्याची सूचना केली होती.

# रेड लाइट एरियात प्रचंड तणाव; पोलिसांच्या कारवाईमुळे धक्काबुक्की

**नागपूर/मुंबई (योगेश होळंब) :** नागपूर शहराच्या पोलीस आयुक्तांनी काही दिवसांपूर्वी अचानक गंगा जमना हा रेड लाइट एरिया सील करून तिथं जमावबंदी लागू केली. तसंच तिथल्या वारांगनांना तिथून निघून जाण्यास सांगितलं. पोलिसांच्या या कारवाईला आता विरोध सुरू असून, दुसरीकडे या कारवाईचं समर्थनही करण्यात येत आहे. रविवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास समर्थक व विरोधक समोरासमोर ठाकल्याने गंगा जमनातील मासूरकर चौकात प्रचंड तणावाचं वातावरण निर्माण झालं. समर्थक व विरोधकांमध्ये धक्काबुक्की झाल्याने वातावरण चिघळलं. कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून या ठिकाणी पोलिसांचा ताफा दाखल झाला. पोलीस दोन्ही गटाला समजवण्याचा प्रयत्न करत आहेत. दहा दिवसांपूर्वी पोलिसांनी गंगा जमनाला सील ठोकून या ठिकाणी जमावबंदी लागू केली. या कारवाईला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अर्बन सेलच्या अध्यक्षा ज्वाला धोटे यांनी विरोध केला. पोलिसांची



ही कारवाई हिटलरशाही असल्याचा आरोप करत रक्षा बंधनापर्यंत या भागातील जमावबंदी न हटवल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. ज्वाला धोटे या समर्थकांसह गंगा जमनात पोहोचल्या. त्यानंतर काही वेळातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या व नगरसेविका आभा पांडे यांच्यासह परिसरातील नागरिकही गंगा जमनाविरोधात व पोलीस कारवाईच्या समर्थनार्थ मासूरकर चौकात आले. पोलीस कारवाईचे विरोधक व समर्थक समोरासमोर आले. त्यांनी एकमेकांना धक्काबुक्की केली. त्यामुळे तणाव निर्माण झाला. माहिती मिळताच पोलिसांचा ताफा तेथे पोहोचला. पोलिसांनी दोन्ही गटाला वेगळे केले. ज्वाला धोटे व नगरसेविका आभा पांडे या दोघीही राष्ट्रवादीच्याच नेत्या आहेत. एकाच पक्षात असूनही एक विरोधक व एक समर्थक असे दोन गट रविवारी पाहायला मिळाले. दोन नेत्या समोरासमोर ठाकल्याने राष्ट्रवादीतील नेत्यांमधील 'अंतर' पुन्हा एकदा समोर आल्याची चर्चा परिसरात होती.

## महाबळेश्वरचे पर्यटन पुन्हा बहरले; सर्वच पर्यटनस्थळे खुली

**महाबळेश्वर (विशाल पाटील)-** देश विदेशातील पर्यटकांच्या पसंतीचे व सर्वाधिक पावसाचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वर पर्यटनस्थळ सर्वासाठी खुले झाले आहे. येथील सर्वच प्रेक्षणीय स्थळे पर्यटकांसाठी खुली करण्यात आली आहेत. महाबळेश्वरचे मुख्य



आकर्षणाचे ठिकाण असलेला वेण्णालेक नौकाविहारही शनिवारपासून पर्यटकांसाठी खुला झाल्याने महाबळेश्वरचे पर्यटन बहरले आहे. गत सप्ताहात प्रशासनाच्यावतीने घेतलेल्या बैठकीत प्रेक्षणीयस्थळे सुरु करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. याच पार्श्वभूमीवर वेण्णालेक नौकाविहार पर्यटकांसाठी खुला करण्यात आला आहे. त्यामुळे पर्यटकांची रेलचेल या परिसरात पहावयास मिळत आहे. येथील अल्हाददायक थंड हवा, धुक्याची दुलई आणि डोळ्याचे पारणे फेडणारी हिरवाईचा सुखद अनुभव घेण्यासाठी पर्यटकांची पावले महाबळेश्वरकडे वळू लागली आहेत.

# कोल्हापूर : वरदचा नरबळी की...खून?

**सोनाळी (ता. कागल) (नितीन देवळेकर)-** येथील सात वर्षांचा निष्पाप बालक वरदचा नरबळी की, खून? अशी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. या प्रकरणाचा उलगडा करण्यासाठी पोलिसांकडून तपास यंत्रणा गतिमान करण्याची गरज आहे. १७ ऑगस्ट रोजी वरदचा त्याच्या वडिलांच्या मित्राकडूनच खून झाला. या खुनाची कबुलीही आरोपी दत्तात्रय ऊर्फ मारुती तुकाराम वैद्य (वय ४४, रा. सोनाळी) याने पोलिसांसमोर दिली आहे; पण हा खून कोणत्या कारणाने झाला? याची संभ्रमावस्था तयार होताच आरोपीने आपल्याला अपत्यप्राप्ती व्हावी, या उद्देशाने वरदचा नरबळी दिल्याची चर्चा सुरू आहे; पण पोलिसांना याचे कोणतेच धागेदोरे सापडत नाहीत. त्यामुळे खून कोणत्या कारणाने झाला? हे शोधण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. सोनाळी व सावर्डे गावच्या ग्रामस्थांनी मुरगूड पोलिस ठाण्यासमोर



मोर्चाने येऊन आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. हा नरबळीचाच अघोरी प्रकार आहे. यातील दोषींना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे व वरदला न्याय मिळालाच पाहिजे, अशी ठाम मागणी ग्रामस्थ व पीडित पाटील कुटुंबीयांची आहे. अन्य सामाजिक व राजकीय संघटनांनीसुद्धा या खुनाची पोलिसांनी नि:पक्षपातीपणे चौकशी करावी व आरोपीला कठोर शिक्षा देण्याची भूमिका मांडली आहे. या निष्पाप वरदचा काहीही दोष नसताना बळी गेल्याने संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहेत. अशा अतिसंवेदनशील व भावनिक परिस्थितीत व कायद्याच्या चौकटीत राहून पोलिसांना तपास करावा लागत आहे. या खुनासंबंधी कोणतेच ठोस पुरावे व धागेदोरे पोलिसांच्या हाती नसल्यामुळे मोठ्या सत्त्वपरीक्षेला पोलिसांना सामोरे जावे लागणार आहे. तसेच जनतेच्या रोषालादेखील सामोरे जावे लागत आहे.

## केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचा मोठा निर्णय, NBF ला स्वयंनियमन संस्था म्हणून मान्यता

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा):** न्यूज ब्रॉडकास्टर्स फेडरेशन (एनबीएफ) च्या कार्यकारिणी सदस्य आणि वरिष्ठ सदस्यांनी नुकतीच यांची भेट घेतली. एनबीएफच्या शिष्टमंडळात अर्णब गोस्वामी, मुख्य संपादक, रिपब्लिक मीडिया नेटवर्क, टीव्ही ९ नेटवर्कचे सीईओ बरुण दास, टीव्ही ९ भारतवर्षचे न्यूज डायरेक्टर हेमंत शर्मा यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते. केंद्रीय मंत्र्यांची भेट घेतल्यानंतर केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाकडून न्यूज ब्रॉडकास्टर्स फेडरेशनला स्वयंनियमन संस्था म्हणून मान्यता दिली आहे. केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाकडून अशा प्रकारची मान्यता मिळणारी एनबीएफ ही एकमेव संस्था ठरली आहे.

केंद्र सरकारनं न्यूज ब्रॉडकास्टर्स फेडरेशन (एनबीएफ) ला स्वयंनियमन संस्थेचा दर्जा मिळणारी पहिली संस्था ठरली आहे. सदस्यस्थितीत इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये पारदर्शकतेची मूलतत्त्वे, स्वनियंत्रण असणारी एनबीएफ ही माध्यमांची एकमेव संस्था आहे. एनबीएफ अगोदरपासूनचं वृत्तवाहिन्यांच्या क्षेत्रातील माध्यम समहू आणि त्यासंबंधी घटकामध्ये स्वनियंत्रित रचना मजबूत करण्यासी कार्यरत आहे. पीएनबीएसए ही संस्था देखील कार्यकरत



असून ती एनबीएफचा घटक आहे. प्रोफेशनल न्यूज ब्रॉडकास्टर्स स्टँडर्डस अथॉरिटी ही संस्था देखील माध्यमातील पारदर्शकता आणि उत्तरादियत्व जपणारी संस्था आहे. पीएनबीएसए ही भारतातील राष्ट्रीय पातळीवरील माध्यमातील संकेत आणि निकष पूर्ण करणारी संस्था आहे. पीएनबीएसए आणि एनबीएफला मिळालेली मान्यता दोन्ही संस्थांच्या कार्यावर शिक्कामोर्तब करते, असं प्रसिद्धीपत्रकाद्वारे एनबीएफनं कळवलं आहे.

## भांडुप येथे मच्छीमार बांधवांच्या प्रतिकृती शिल्पाचे महापौरांच्या हस्ते अनावरण

मुंबई शहराचे मूळ रहिवासी, मुंबईच्या जडणघडणीमध्ये ज्यांचा सिंहाचा वाटा आहे अशा आगरी-कोळी बांधवांची संस्कृती जिंवत



रहावी, पुढच्या पिढीला समजावी या उद्देशाने भांडुप गावच्या वेशीवरील मच्छीमार बांधवांच्या प्रतिकृतीचे शिल्प साकारण्यात आले आहे. आमदार सुनील राऊत यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या शिल्पाचे अनावरण रविवारी नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांच्या हस्ते पार पडले. नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात आगरी-कोळी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगरी-कोळी गीते आणि पारंपरिक नृत्याने यावेळी सर्वांचे लक्ष वेधले. यावेळी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यासह आमदार सुनील राऊत, परशुराम कोपरकर, एकवीरा आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष रमाकांत पवार, गोविंद पवार, नंदकुमार पवार, विभागप्रमुख-आमदार रमेश कोरगावकर, म्यावेळी उपस्थित होते.

# कल्याणच्या आदिवासी पाड्यात 'वृक्षाबंधन'

**डोंबिवली (दिगंबर जाधव)-** रक्षाबंधन हे बहीणभावाच्या अतूट प्रेमाची साक्ष देते. हातावर राखी बांधणाऱ्या बहिणीला तिच्या रक्षणाची हमी भाऊ देतो. याच रक्षाबंधनाचे औचित्य साधून कल्याणच्या सापर्डे येथील पाणबुडे नगरात स्थानिक आदिवासी आणि पर्यावरणप्रेमींनी वृक्षांना राखी बांधून त्यांच्या रक्षणाची ग्वाही दिली. विशेष म्हणजे पर्यावरण दिनी या पाड्यातील मुलांनी येथे वृक्षारोपण केले होते. त्याचे पालकत्व त्यांच्याकडे असून रक्षाबंधन दिनी वृक्षाबंधन करून त्यांनी या झाडांच्या संगोपनाची हमी घेतली. कल्याणच्या पाणबुडे नगर आदिवासी वस्तीतील मुलांनी नुकत्याच



झालेल्या पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विविध प्रकारची झाडं लावून त्यांचे पालकत्व स्विकारले आहे. आपल्या कुटुंबातील एका सदस्याप्रमाणे ही आदिवासी मुलं या झाडांचा सांभाळ करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून रक्षाबंधनाचा हा सण या आदिवासी बांधवांनी व अनुबंध संस्थेच्या सदस्यांनी या झाडांसोबत साजरा केला. ज्याप्रमाणे बहीण आपल्या भाऊरायाला ओवाळते आणि मग राखी बांधते अगदी त्याचप्रमाणे या आदिवासी महिला आणि मुलांनी झाडांना ओवाळून राख्या बांधल्याचे दिसून आले. बहीण-भावाच्या या नात्याबरोबरच आज पर्यावरणाचे रक्षण करणे हीदेखील काळाची गरज बनली आहे.

## बेवारस मृतदेह



बेवारस मयत इसमः विजय कुमार पंडीत,वय- ३२ वर्षे, धंदा- कचरा वेचणे, राठी- गेट नं- १८, बांद्रा टर्मिनल ब्रीजखाली, बांद्रा,पुर्व, मुंबई

**वर्णनः वय अंदाजे ३२ वर्ष, उंची- ५फुट ४ इंच, बांधा- सडपातळ, वर्ण- सावळा, केस- विरळ, दाढी व मिषा पांढरी व काळी वाढलेली, डोळे -बारीक**

फोन : ९५६१४०६१७१
तपासी अधिकारी पोउपनि घोगरे/ निर्मलनगर पोलीस ठाणे, मुंबई.

# 'आई, पुन्हा तुझ्या पोटी जन्म घेईन,' पुण्यात सासरच्या जाचाला कंटाळून जावयाची आत्महत्या

**मुंबई (विशाल कारंडे)** पती पत्नीच्या भांडणात दिराने हार्पिक पाजल्याची घटना दोन दिवसांपूर्वी घडली होती. या प्रकरणी पतीसह तिघांविरोधात चतुःश्रृंगी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेला काही तास होत नाही तोवर पतीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. सासरच्या मंडळींकडून सततच्या छळाला कंटाळून आत्महत्या करत आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी लक्ष घालून सासरच्या मंडळींवर कारवाई करावी, अशी सुसाईड नोट सापडली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निखिल आणि सोनाली यांच एक वर्षापूर्वी लग्न झालं होतं. दोघांचा संसार ठीकठाक सुरू होता. सोनाली नऊ महिन्यांची गर्भवती असताना बाळंतपणासाठी कोणत्या रूग्णालयात नाव नोंद करायचे यावरुन दोघांमध्ये वाद झाला होता. त्याचदरम्यान सोनाली यांचा दीर विकास आणि लक्ष्मी या दोघांनी पकडून हार्पिक क्लिनर पाजले. यानंतर तिला तात्काळ ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिच्यावर उपचार सुरू



आहेत. तर या प्रकरणी पती निखिल धोत्रे, विकास धोत्रे आणि लक्ष्मी धोत्रे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेचा तपास सुरू आहे. दरम्यान रविवारी दुपारच्या सुमारास निखिल त्याच्या बेडरुममध्ये एकटाच होता. बराच वेळ झाला तरी तो रूमच्या बाहेर न आल्याने त्याच्या भावाने दरवाजा वाजवला. यावेळी आतून काही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर दरवाजा तोडून रूममध्ये गेल्यावर, निखिल याने ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे आढळून आले.

निखिल याने आत्महत्या करण्यापूर्वी एक सुसाईड नोट आढळून आली. त्यामध्ये निखिल याने असे म्हटले आहे की, आपल्याला सासरच्या लोकांनी खूप त्रास दिला आहे. त्यांच्यामुळे आपण कर्जबाजारी झालो असून माझ्या मृत्यूला तेच जबाबदार आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, पालकमंत्री अजित पवार यांनी त्यांच्यावर कठोर कारवाई करावी असे त्यात म्हटले आहे. आई तू काळजी करु नकोस, मी पुन्हा तुझ्या पोटी जन्म घेईन. आई मी समजून माझ्या बाळाला सांभाळ, त्याची काळजी घे', असे लिहिले आहे. तर या प्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास करण्यात येत आहे.

# ...म्हणून तर आगरी, कोळी बांधवांना मुंबईतून विस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू नाही ना?

**मुंबई (नितीन देवळेकर)-** आगरी, कोळी बांधवांना मुंबईतून विस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे म्हणत, अनेक ठिकाणचे मासळी बाजार बंद केले जात आहेत असं मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी म्हटले आहे. याबाबत मनसे नेते संदीप देशपांडे यांनी ट्विट केले आहे.

या ट्विटमध्ये संदीप देशपांडे यांनी म्हटले आहे की, 'खरे तर आगरी, कोळी बांधव हे मुंबई चे मूळ रहिवाशी. त्यांनाच सध्या विस्थापित करण्याचा प्रयत्न चालू आहे. अनेक ठिकाणचे मासळी बाजार बंद केले जात आहेत कोळीवाडे उध्वस्त केले जात आहेत. विमान तळाला दि.बा. पाटील साहेबांच्या नावाचा आग्रह हे तर कारण नाही ना??' असं त्यांनी म्हटले आहे. मागील अनेक दिवसांपासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील



यांचे नाव देण्याची मागणी होत आहे. प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी ही मागणी लावून धरत अनेक आंदोलन केली आहे. यामुळेच आगरी, कोळी बांधवांना मुंबईतून विस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची शंका देशपांडे यांनी व्यक्त केली आहे. प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी स्थानिकांनी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाचा आग्रह धरला आहे. तर राज्य सरकारने शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा, तिकडे बंजारा समाजाने या विमानतळाला माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचं नाव द्यावं देण्याचा आग्रह धरला आहे. यामुद्द्यावरून राजकिय वातावरण चांगलेच तापले आहे. दरम्यान मुंबईतील अनेक ठिकाणचे मासळी बाजार बंद केले जात असल्याने विमानतळ नावाच्या मुद्यांवरून आगरी, कोळी बांधवांना मुंबईतून विस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची शंका देशपांडे यांनी व्यक्त केली आहे.